**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभवन डॉ.बाबासाहेबआंबेडकर चौक,रेल्वे लाईन-413001
सोलापूर –सहा.अभियंता –भ.क्रं.9422457924
Mail Id –smcasstlight@gmail.com

# निविदा सुचना- 2025-26

मा.महाराष्ट्र शासन 2011 चा अध्यादेश क्र.12 नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई दि 21 मे 2011 नुसार प्राप्त अधिकारानुसार सोलापूर महानगरपालिका, सोलापूर विद्युत विभाग (मुख्य कार्यालय) कडुन अश्या प्रकारचे कामांचे अनुभव असलेले विद्युत ठेकेदारांकडून खालील कामाकरिता दोन लिफाफा पध्दतीने छापील फॉर्ममध्ये आयटेम रेट सील बंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर कोऱ्या निविदा मुख्यलेखापाल कार्यालय येथे दि-18/12/2025-ते दि.-20/12/2025-पर्यंत मिळतील. सदर ची निविदा सुचना www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात आलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मक्त्याची ररु. | बयाणा र.रु. | सुरक्षित रक्कम | कामाची मुदत | फॉर्म फी र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | **सो.म.पा.सार्वत्रिक निवडणूक 2025-2026 करीता मा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं .4 यांचे अंतर्गत सर्व मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व स्पिकर व्यवस्था करणे.** | 3.60 लाख | 3600/- | 7200/- | निवडणूक कालावधी करीता | 600/- |
| 2. | निविदा तारीख वेळ व ठिकाण | दि .18-/-12-/2025 ते दि .20-/-12-/2025 | | | | |
| 3. | बयाणा रक्कम भरणेची तारीख व वेळ | दि 18-/-12-/2025 ते दि .19-/-12- /2025 ~~दु 1.00~~ पर्यंत | | | | |
| 4. | निविदा स्विकारणेची तारीख व वेळ | दि .20-/-12-/2025 ते दि .----/--- /2025.1.00 पर्यंत | | | | |
| 5. | निविदा उघडण्याची तारीख वेळ व ठिकाण | दि . 20-/-12-/2025 दु,2.00 पर्यंत. | | | | |

**शर्ती व अटी :-**

1.बयाणा रक्कम रेखीने भरावयाची आहे.

2.मक्तेदारास 'अ'लिफाफा मध्ये पॅन कार्ड, GST प्रमाणपत्र, विद्युत ठेकेदार प्रमाणपत्र ,सदर पुरवठा हे निवडणुकी संदर्भात व कालावधीचे असल्याने यापूर्वी निवडणूकी सबंधी पुरवठा केलेले स्थानिक पुरवठादार यांना प्राधान्य देण्यात येईल व 'ब' लिफाफा मध्ये मुल्यनिविदांवर आयटेम दर सादर करणे बंधनकारक असेल.

3.सदर कामाकरिता नियमाप्रमाणे स्वतंत्र GST देण्यात येईल.

4.सदर कामांबाबत अधिक माहिती सहा.अभियंता - विदयुत विभाग, सोलापुर महानगरपालिका यांचे कार्यालयाकडुन घेण्यात यावी.

5.नियमाप्रमाणे सर्व कराची बिलातुन कपात करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

6.सदर मतमोजणी कक्ष येथे IE रुलप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.

7.ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (ॲडव्हान्स) दिला जाणार नाही.

8.निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने विहित कालावधीत काम पूर्ण न केल्यास व त्याचा निवडणूक कामावर परिणाम होवू नये म्हणून अन्य पुरवठादाराकडून काम करून घेण्यात येईल व जास्तीचे खर्चाच्या फरकाची रक्कम संबंधित निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल. व सुरूवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकार जमा करण्यात येईल. तसेच निविदा किमतीच्या 5% पर्यंत अतिरिक्त दंड आकारण्यात येईल.

9.निविदेतील साहित्य पुरवठा करणेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ निविदाधारकाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

10.मान्यताप्राप्त नमुन्यामध्ये सुस्थितीतील विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर अनुषंगिक साहित्य पुरवणे ठेकेदारास बंधनकारक राहील. विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर अनुषंगिक साहित्य वापरात असताना नादुरूस्त झाल्यास ते ताबडतोब बदलून देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्याच प्रमाणे विद्युत व्यवस्थेशी संबंधित सर्व बाबीमध्ये म.रा.वि. वितरण कंपनी सोलापूर व विद्युत निरीक्षक कार्यालय सोलापूर यांच्याकडून रितसर परवानगी घेणे व योग्य ती सुरक्षा काळजी संबंधित निविदाधारकाने घ्यावयाची आहे. त्यांच्या निष्काळजीपणामुळे होणाऱ्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

11.निविदाधारकांना निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी शर्ती व नियम या व्यतिरिक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ट करू नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

12.सदर चे दर सर्व कर,वाहतुकी सहित देण्यात यावे .

13.कामांवर कोणताही विद्युत अपघात घडल्यास याची संपूर्ण जबाबदारी सबंधित मक्तेदारावर राहणार आहे.

14. प्रत्यक्ष जागेवर परिस्थीती नुसार व वरीष्ठच्या आदेशानुसार साहित्यांची संख्या कमी जास्त होणाची शक्यता आहे.

15.सदर चे काम हे निवडणुकीचे असल्याने बिनचूक पणे मुदतीत करणे बंधनकारक राहणार आहे.कामांत टाळाटाळ अथवा दिरगांई केल्यास सबंधिता विरुध्द निवडणुक कायदा अंतर्गत कारवाई ठेवण्यात येईल.

16.प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती नुसार सबंधित अधिकारी यांचे मागणी प्रमाणे सर्व प्रकाराचे विद्युत साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील.

17.सदर व्यवस्था सर्व आवश्यक त्या साहित्य सह करणेचे आहे.

18. अनुदान उपलब्धतेनुसार देयक आदा करणेत येईल.

19. सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्ती मध्ये कोणतीही कारणे न देता व कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द करण्याचा / राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क मा. आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

Digitally signed by
RAJESH MADHUKAR PARDESHI
Date: 17.12.2025 20:03:11

कार्यकारी अभियंता (विद्युत)
सोलापूर महानगरपालिका, सोलापुर.

Scanned with OKEN Scanner